# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०६/२०१८

**१) संगनमत करुन लाथाबुक्यांनी मारहान करुन जिवानिशी ठार मारल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/०६/२०१८ चे ०८.००ते ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मित्र मृतक— प्रकाश जयराम धुर्वे वय ४३ वर्ष, रा. नेहरु वार्ड मेंढा हा त्याचे मुलीला बिस्कीट उधारी मागण्यासाठी आरोपी क्र. १ यांचे दुकाणात गेला असता त्याने बिस्कीट उधारी देत नाही असे बोलुन भांडण, शिवीगाळ करुन भिंतीवर ढकलुन खाली पडल्यानंतर पुन्हा लाथाने मारले त्यानंतर आरोपी क्र. २+३ हे दुकानाचे बाहेर येवुन तिघांनी संगनमत करुन लाथाबुक्यांनी मारहान करुन जिवानिशी ठार मारल्याने वैदयकीय अधिकारी सामान्य रुग्नालय भंडारा यांनी मृत घोषीत केल्याने फिर्यादी योगेंद्र यशवंत शहारे वय ३४ वर्ष, रा. नेहरु वार्ड मेंढा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०२,३४ भादंवि. सहकलम ३(२)(५)अ.जा.ज.अप्र.का १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी आशिष दामाजी बोंद्रे वय २६ वर्ष रा. सितेपार यांची पत्नी सामान्य रुग्नालय भंडारा येथे डिलेवरी करीता भरती होती तिच्या करीता डब्बा घेवुन सामान्य रुग्नालय भंडारा येथे येवुन पॅशन प्रो लाल रंगाची मोटार सायकल क्र. एमएच३६ क्यु २२०० किंमती २५,०००/—रु. चा सायकल स्टॅंडवर ऊभी करुन दवाखान्यात गेला असता डब्बा घेवुन परत आल्यावर ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) कंटेनर गाडीच्या मागच्या चाकाखाली येवुन गंभिर जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/०६/२०१८ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील मृतक टेकाम महादेव वाढई वय ४५ वर्ष, रा. जेवनाळा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ एसी ५७६३ ने लाखनी वरुन भंडारा येथे एनएच ६ रोडने येत असता मातीचे स्लोप वरुन रोडवर येत असतांना मृतकची गाडी स्लिप होवुन आपले मोटार सायकल सह उजवे बाजुचे दिशेने पडल्याने मागेहुन येणारा कंटेनर क्र. एनएच ०१ एबी ०८६१ च्या मागच्या चाकाखाली येवुन गंभिर जखमी होवुन स्वतः मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मोरेश्वर किसन मेंढे वय ५० वर्षद्व रा. कृष्ण नगरी खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अशोक मोहरकर कॉलेजमधील साहीत्याची चोरी :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील अशोक मोहरकर कॉलेजचे आत मधील चॅनल गेट व खोलीचे ताले तोडुन आत प्रवेश करुन खोल्या मधील असेलेले १ विडीओकॉन एलसीडी टि. व्ही. आहुजा एम्लीफायर, आहुज सेज माईक, स्टुडीओ मास्टर, केबल माईक, पिपि वाचर्स ब्राउज, आहुज ड्रव्हर युनीट २ असा एकुण ३७,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी डॉ. रमेश मोतीराम बावनकुळे वय ५० वर्ष, रा. अडयाळ ( कार्यकारी प्राचार्य ) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**५) इसमास मारहान करुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २७/०५/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी मृतक— सोमा किसनजी रहांगडाले वय ८५ वर्ष, रा. गोंडीटोला यास वघारी बांधण्याचा कारणा वरुन वाद घालुन मारहान केल्याने मृतकने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याने नमुद आरोपीतांनी मृतकास मारहान करुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने फिर्यादी लोकेश सोमाजी रहांगडाले वय ४५ वर्ष, रा. अंगुर बगीचा रोड गोंदिया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३०६,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) मोटार सायकल चालकाने महिलेस धडक देवुन जखमी करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कु. उर्वशी संतोष देशपांडे वय १५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड आंबाळी ही आपले आईसह घरी डांबरी रोड पायी क्रास करुन रोडचे बाजुने जात असता कारधा कडुन येत असलेल्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीची आई सौ. पोर्णीमा संतोष देशपांडे वय ३८ वर्ष, हिला धडक देवुन जखमी करुन पळुन गेल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०२/०६/२०१८ चे १२.०० ते १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगा वय १७ वर्ष, हा आपले आई जवळ मी १७ वर्ष, हा आपले आई जवळ मी भंडारा येथे टिवशनला जातो व बचत गटाचे पैसे सुध्दा भरुन येईल असे घरी सांगुन घरुन निघुन गेला परंतु अजुन पर्यत घरी परत आला नाही असे फिर्यादीचे तोंडी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्दशा नुसार फिर्यादीचा मुलगा हा अल्पवयीन असल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) ईलेक्ट्रीक शॉक लागुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०७/०६/२०१८ चे १०.०० वाजता ते ०६/०६/२०१८ चे ००.१५ वाजता दरम्यान यातील मृतक रमेश कृष्णा नारनवरे वय ३५ वर्ष, रा. पाऊनगांव हा संजय धुर्वे यांचे कडे ठेक्याने एमएसईबीचे पोल उभे करण्यास तसेच वायरींगचे काम करीत असुन यातील मृतक याने पोल वर चढुन वायरींग करित असता अचानक ईलेक्ट्रीक शॉक लागुन खाली पडल्याने त्यास ग्रामीण रुग्नालय पवनी येथे उपचाराकामी आणले असता मरण पावल्याने फिर्यादी महेंद्र देविदास नारनवरे वय ३५ वर्ष, रा. पाऊनगांव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**९) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक १७/०५/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील मृतक वसंता नारायण चौधरी वय ५० वर्ष, रा. आसोला हा त्याचे गावी मोटार सायकलने जात असता ट्रॅक्टरचे लाईट डोळयावर पडल्याने ट्रॅक्टरचे ट्रालीत अडकुन खाली पडल्याने मार लागुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र . ००/१८ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०७/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९१प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०३, तीन सिटर वाहनाकरीता— ०२ ईतर वाहनांवरती — ८६ केसेस करण्यात आले आहे.

**(सपोनि. एच. एन. रायपुरे)**
**पोलीस नियत्रंण कक्ष**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.